REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा - २००२ ची वैशिष्ट्ये

डॉ. संतोष बाबूराव कुज्हे
लोकप्रशासन विभाग प्रमुख, स्वा.सै.सुर्यभानजी पवार महाविद्यालय पुर्णा, जि.परभणी.

## प्रस्तावना :

### महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा - २००२ :

मा.अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धी जि.अहमदनगर येथून महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००० मध्ये सुधारणा करण्यासाठी आंदोलन सुरु केले. याची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या कायद्याचा सुधारित मसुदा तयार करण्यासाठी आंदोलन सुरु केले. याची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या कायद्याचा सुधारित मसुदा तयार करण्यासाठी जी समिती गठीत केली होती त्यामध्ये विधी व न्याय मंत्री अध्यक्ष, प्रधान सचिव सामान्य प्रशासन विभाग, अप्पर मुख्य सविच, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ.जाधव गोडबोले, डॉ.सत्यरंजन साठे, अॅड सत्यरंजन धर्माधिकारी आणि विजय कुवळेकर यांचा समावेश होता . या समितीने तत्कालीन विविध राज्यातील कायदे व केंद्र सरकारच्या विचाराधीन असलेल्या तरतुदींचा अभ्यास करुन एक मसुदा तयार केला. या मसुद्याला विधानसभा, विधान परिषद, राज्यपाल, राष्ट्रपती यांची संमती घेवून महाराष्ट्राचा २००० चा कायदा सुधारित करुन २३ सप्टेंबर २००२ पासून प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या स्वरुपात पूर्वलक्षी प्रभावाने सुरु करण्यात आला. २००२ च्या कायद्याची वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत.

## वैशिष्ट्ये :

### कायद्याचा उद्देश :

महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा- २००२ चा उद्देश पूर्वीच्या कायद्यापेक्षा व्यापक करुन त्यात पादर्शकता, खुलेपणा,जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही समाजव्यवस्थेत जनतेचा सहभाग वाढवणे असा होता.

### व्याप्ती वाढवली :

२००२ पूर्वीच्या महाराष्ट्राला कायद्यातील माहिती मागणाज्या व्यक्तीच्या प्रामणिक हेतूची तरतुद काढून त्यात शासन व शासनाच्या संस्था, संघटना यामधून जो दस्तऐवज मिळत होता त्याची व्याप्ती वाढवून संबंधीत माहिती डिस्केट्स,फ्लॉपी, इलेक्ट्रॉनिक प्रकार अशा स्वरुपात देण्याचे ठरवले.




### सोपी पद्धती :

अर्जदाराला माहिती मिळविण्यासाठी १५ दिवसांची तरतुद केली गेली तसेच अर्ज नामंजूर करणे व जीवीत आणि वित्त स्वातंत्र्याची माहिती अर्जदाराला २४ तासांच्या आत पुरवली जाईल याची तरतुद केली गेली. हा अर्ज फेटाळतांना त्याची कारणे व आव्हान अधिकारी याची माहिती अर्जदाराला लेखी देण्याची तरतुद केली गेली होती.

### माहितीचे सामान्यीकरण :

महाराष्ट्राच्या २००२ च्या कायद्यात माहिती नाकारण्याच्या तरतुदीची संख्या (कलम ८ ) नुसार ३२ वरुन ११ करण्यात आली. यात एखाद्या व्यक्तीने मागितलेली माहिती नाकारण्याच्या हक्कातील अभिलेखाच्या भागात असल्यास व ही माहिती कायद्यात असल्यास ती मूळ अभिलेखापासून वेगळी करण्याची तरतुद यात करण्यात आली. (कलम १०)

### अपील (आव्हान पद्धत)

अर्जदाराचा अर्ज नामंजूर झाल्यास तो माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध ३० दिवसांच्य आत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे आव्हान अर्ज दाखल करण्याची तरतुद व अपील अधिकाऱ्याने दिलेला निर्णय मान्य नसल्यास अंतीम आव्हान लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांच्याकडे करण्याची तरतुद होती.(कलम ११) आणि त्यांचा निर्णय अंतीम असल्याची तरतुद होती.

### दंड

या कायद्यानुसार एखाद्या अधिकाऱ्याने संबंधीत माहिती दिलेल्या मुदतीत, अयोग्य, चुकीची, दिशाभूल करणारी दिल्यास त्याला अर्जाच्या सुनावणीतील नियमानुसार प्रत्येक दिवसाच्या विलंबास रु.२५०/- दंडाची तरतुद केली गेली होती. या कायद्याच्या (कलम १२) नुसार दंडाची जास्तीत जास्त रक्कम रु. २०००/- रु. करुन त्याच्या वेतनातून कपात करण्याची तरतुद करुन शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते.

### माहिती स्वतःहून प्रसिद्ध करण्याची तरतूद :

महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा - २००२ नुसार प्रत्येक शासकीय प्राधिकरणांना त्यांच्या स्वतःच्या कार्याचा तपशील, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार,कर्तव्य, निर्णय घेतांना अनुसरावयाची पद्धती, शासन निर्णय,आदेश, कार्यालयीन अभिलेखांची यादी तसेच प्रशासकीय निर्णयांशी संबंधीत सर्व माहिती प्राधिकरणांनी स्वतःहून प्रसिद्ध करण्याची तरतूद यात करण्यात आली होती. (कलम ४ (ख,ग)

### अभिलेख आयोगाची स्थापना :

शासनाचे प्रतिनिधी, समाजातील नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती यांचा मिळून शासनामार्फत अभिलेख आयोग स्थापन करण्याची तरतुद करण्यात आली. (कलम-१४) जुने अभिलेख जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाला सल्ला देणे हे या आयोगाचे कार्य होते. अभिलेख आयोगाचा निर्णय शासनावर बंधनकारक होता.

### राष्ट्रसंरक्षणाबाबतची माहिती ठरविण्यासाठी समितीची तरतुदः

शासनाचे मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती, ज्यात दोन सदस्यांची नियुक्ती शासनामार्फत केली होती. ज्या माहितीमुळे देशाच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला धोका निर्माण होईल म्हणून माहिती देण्यात येणार नव्हती. अशा बाबतीत मागितलेली माहिती देणे अथवा न देणे हे ठरविण्यासाठी संबंधीत समिती गठीत करण्यात आली होती. सदर महिती सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ताबडतोब समितीकडे पाठवून ही माहिती देता येत नाही, असे या समितीने सांगीतले तर ती माहिती नाकारण्याची तरतुद करण्यात आली होती (कलम ७(क) )

### परिषदा गठित करणे :

माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी "राज्यस्तरीय परिषद " गठीत करण्याची तरतुद करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्ष मा.मुख्य सचिव असतील तर समाजातील नामवंत व्यक्ती, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, शिक्षणतज्ञ, अशासकीय संघटनांचे प्रतिनधी सदस्य असतील अशी तरतुद या कायद्यात करण्यात आली होती (कलम १३) (१) ) या बरोबरच महसूल विभागासाठी संबंधीत महसूल आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली परिषद गठीत करण्यात यावी आणि राज्यस्तरीय परिषदे सारख्याच प्रतिनिधींची नेमणुक करण्याची तरतुद यात होती. या परिषदा सहा महिण्यातून किमान एकदा या कायदद्याच्या कामाचा आढावा घेऊन शासनास मार्गदर्शन करतील अशी तरतुद करण्यात आली होती. (कलम १३ (२)

### सक्षम प्राधिकाऱ्यांच्या नियुक्त्या :

कायद्याच्या अंमलबजावणीची "सक्षम प्राधिकारी " कोणते या कायद्यात स्पष्ट करण्यात आले होते. यात राज्य शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाचा प्रमुख, राज्यातील शासकीय व इतर प्राधिकरणांचे प्रशासकीय प्रमुख, सहकारी संस्थांसाठी सहकारी संस्थांचे निबंधक, सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्थेसाठी धर्मदाय आयुक्त, श्रमिक संघाकरीता कामगार आयुक्त, महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी लोकसेवा आयोगाचा सचिव, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांच्यासाठी तसेच प्रशासकीय शाखेसाठी लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे प्रबंधक यांची तरतुद करण्यात आली होती. (कलम ३)

### संदर्भ ग्रथ

- कचरे प्रल्हाद आणि गायकवाड शेखर, कायदा माहितीचा अन् अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी, बाणेर रोड, पुणे. (२०१०)

- कायंदे डॉ. गंगाधर, संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स, गंगापूर रोड, नाशिक. (२००५)
- काणे प. सि., लोकप्रशासन, विद्या प्रकाशन, रुईकर मार्ग, नागपूर. (१९९२)
- काणे प. सि., राजकीय सिद्धंत : आधारभूत संकल्पना, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर. (२००२)
- कुलकर्णी डी. एस., भ्रष्टाचार निर्मुलन व उपाययोजना, सुयोग प्रकाशन, पुणे (२००६)
- कुलकर्णी डी. एस., माहितीचा अधिकार, मनोरमा प्रकाशन, दादर (पू.), मुंबई. (२००७)
- गर्गे स. मा. (संपा.), भारतीय समाज विज्ञान कोश, व्हाल्यूमर, पुणे. (२००७)
- गेरा नलिनी, राम जेठमलानी, मराठी अनुवाद, सौ. विदुला देशपांडे, चिनार पब्लिशर्स, पुणे. (२००५)
- गोडबोले माधव, पब्लिक अकाउण्टॅबिलीटी अँड ट्रान्सपरन्सी दी इम्पेरिटिव्हस ऑफ गुड गव्हर्नन्स, ओरिएन्ट लॉगमन, नवी दिल्ली. (२००३)
- गोडबोले माधव, प्रशासनाचे पैलू, श्री विद्या प्रकाशन, पुणे, खंड २ (२०००)
- गर्दे दि. कां. आणि बाचल वि. मा., आधुनिक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. (१९७९)